**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

दिनांक २७/०७/२०२६ (सोमवार )

## मा. श्री. आशिष जयस्वाल , राज्यमंत्री आणि मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण यांनी पिपरीया, सिल्लारी ,पेंच येथील MARVEL कृत्रिम बुध्दीमत्ता प्रणाली द्वारे लावलेल्या कॅमेऱ्यांची केली पाहणी

आज दिनांक २७/०७/२०२६ रोजी मा. श्री. आशिष जयस्वाल, राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा आमदार , रामटेक विधानसभा आणि मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण यांनी **MARVEL ( Maharashtra Research and Vigilance for Enhanced Law Enforcement )** ने पिपरीया आणि सिल्लारी, पेंच वनक्षेत्राच्या भागांमध्ये लावलेल्या **AI** सक्षम देखरेख कॅमऱ्यांची प्रत्यक्ष पाहणी केली.

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार यांनी मा. श्री. आशिष जयस्वाल यांना **MARVEL** प्रकल्पांतर्गत उभारण्यात आलेल्या **AI** सक्षम देखरेख कॅमेऱ्यांच्या कार्यप्रणालीबाबत सादरीकरण करून प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखविले. सदर प्रकल्पांच्या माध्यमातुन वनक्षेत्रालगत गावांमध्ये वन्यप्राण्यांची हालचाल वेळेवर ओळखणे शक्य होत असुन नागरिकांना तात्काळ इशारे देण्याची सुविध उपलब्ध झाली आहे. यामुळे माणूस — वन्यप्राणी यांच्यातील संघर्षात लक्षणीय घट होत असल्याचे निदर्शनास आले आहे. हा उपक्रम स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेसोबतच वन्यजीव संवर्धनासाठीही अत्यंत उपयुक्त ठरत असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वनक्षेत्रातील सुरक्षा अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

यावेळी मा. श्री. आशिष जयस्वाल, राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा आमदार , रामटेक विधानसभा यांनी **MARVEL** प्रकल्पाच्या माध्यमातून वन्यप्राण्यांच्या हालचालींवर प्रभावीपणे लक्ष ठेवून नागरिकांना वेळेवर इशारा देण्याच्या या अभिनव उपक्रमाचे तसेच

आधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांची सुरक्षितता आणि वन्यजीव संवर्धन साध्य करण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीसांनी केलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले.

मा. श्री. आशिष जयस्वाल, राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा आमदार , रामटेक विधानसभा आणि मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांच्यासह वन विभागाचे अधिकारी, देवलापार पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी सपोनि श्री नारायण तुरकुंडे आणि **MARVEL** चे अधिकारी साईकृष्ण बुडामगुंटा तसेच पिपयीया आणि सिल्लारी गावचे सरपंच आणि स्थानिक ग्रामस्थ हजर होते.




MARVEL
The problem
Tigers, leopards, and sloth bears vocalise rarely. Their prey do not.
In Indian forest habitats, sambar deer, langurs, chital, muntjac, and peafowl produce highly characteristic alarm vocalisations when a predator is detected. These prey-cascade signals are present in most predator encounters; the predator's own vocalisations are present in few.



MARVEL
CAPABILITIES - 1 OF 2
Operational Features
02
Acoustic Threat Detection
On-board mics record animal sounds to identify distress calls made when they see a predator.
03
Real-Time Alerts (~2 min)
Alerts are raised at the site through sirens and strobe lights, along with mobile alerts.
04
Command & Control Dashboard
One console: live feeds, GIS maps, heatmaps and risk scores for fast, informed field decisions.





## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ०८ गोवंश जनावरांची सुटका, वडोदा पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन वडोदा :— दिनांक २६/०७/२०२६ रोजी वडोदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी वडोदा भामेवाडा पानदन ते आसलवाडा रोडवर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान एक बोलेरो पिकअप वाहन क्र. एम एच—४०/डी सी १८१० हे वाहन मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता **चालक नामे १) अजय नरेश रोकडे, वय २८ वर्षे, रा. वॉर्ड क्र. ०२, वडोदा ता. कामठी, जि. नागपुर** हा मिळुन आला. वाहन मालका बाबत

विचारना केली असता वाहन मालक आरोपी क्रं **२) सचिन शिवराम मरकाम, वय ४३ वर्ष, रा. बाजार चौक वडोदा, ता. कामठी, जि. नागपुर** हा असल्याची माहीती प्राप्त झाली. पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०८ गोवंशीय जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आला.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून वाहन किंमती ५,००,०००/—रूपये आणि ०८ गोवंशीय जनावरे किंमती १,२०,०००/—रूपये असा एकुण ६,२०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपी चालक नामे १) अजय नरेश रोकडे, रा. वॉर्ड क्र. ०२, वडोदा ता. कामठी, जि. नागपुर २) सचिन शिवराम मरकाम, रा. बाजार चौक वडोदा, ता. कामठी, जि. नागपुर यांचेविरूद्ध कलम ११(१) (ड), (ई), (फ) प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध अधि. १९६० सहकलम ५ (अ), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**



# प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ०६ लाख ६८ हजार ९२५ रूपयांचा मूद्देमाल जप्त;केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक २६/०७/२०२६ रोजी केळवद पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखुची अवैधरित्या वाहतुक केली जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच केळवद पोलीसांनी मौजा खुर्सापार शिवार पांढुर्णा नागपुर हायवे रोडवर नाकाबंदी करत कारवाई केली असता **आरोपी आकाश श्रीकृष्ण भुते, वय २६ वर्ष, रा. तिनखेडा, त. सौसर, जि. पांढुर्णा (म.प्र)** हा महिन्द्रा एक्सयुव्ही ५०० वाहन क्रं. एम.एच—२०/डी.जे.—९४५५ सह मिळुन आला. पंचासमक्ष वाहनाची झडती घेतली असता त्याचेजवळ महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण वजन ७१.२८ किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती १,५३,९२५/— रूपये, महिन्द्रा एक्सयुव्ही ५०० वाहन क्रं. एम.एच—२०/डी.जे.—९४५५ किंमती ५,००,०००/—रूपये, ०१ मोबाईल किंमती १५,०००/—रूपचे असा एकुण ६,६८,९२५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा केला होता. **आरोपी आकाश श्रीकृष्ण भुते, वय २६ वर्ष, रा. तिनखेडा, त. सौसर, जि. पांढुर्णा (म.प्र)** यांचेविरूद्ध पोस्टे केळवद येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर आरोपीला अटक करण्यात आली आहे.

# रामटेक येथे स्टुडंट पोलीस कॅडेट (SPC) अंतर्गत जनजागृती व ड्रिल प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि २७/०७/२०२६ रोजी रामजी महाराज देशमुख, नगर परिषद विद्यालय, रामटेक येथे स्टुडंट पोलीस कॅडेट (SPC) अंतर्गत जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले.

सदर कार्यक्रमात पोलीस निरीक्षक श्री. गणेश फुलकवर, प्रभारी अधिकारी, भरोसा सेल यांनी विद्यार्थ्यांना स्टुडंट पोलीस कॅडेट (SPC) ची उद्दिष्टे, शिस्त, नेतृत्वगुण, सामाजिक जबाबदारी तसेच पोलीस—जनता मैत्री याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.तसेच उपस्थित विद्यार्थ्यांना महिला व बालकांची सुरक्षा, लहान मुला—मुलींवरील अत्याचारांपासून बचाव, ऑनलाइन फसवणुकीचे प्रकार तसेच सायबर गुन्हयांपासून सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक खबरदारी, वाहतूक नियमांचे पालन याबाबत माहिती देऊन जनजागृती करण्यात आली.तसेच ड्रिल इन्स्ट्रक्टर (DI) यांनी विद्यार्थ्यांकडून शिस्तबद्ध ड्रिल प्रॅक्टिस करून घेतली. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून मार्गदर्शनाचा लाभ घेतला.


SPC विषय





## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०३ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत दिनांक २६/०७/२०२६ रोजी पोलीस स्टेशन नरखेड, कळमेश्वर, खापा येथे अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड** अंतर्गत आरोपी श्रीनिवास लहानुजी दातीर, वय ४५ वर्ष, रा. खैरगाव, ता. नरखेड हा जुनी वस्ती पिरबुवा दर्गा जवळ खैरगाव नरखेड येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत आरोपी अनुराग गंगाधर खंडाळे, वय २३ वर्ष, रा. वार्ड नं. ०२, ब्राम्हणी, तह. कळमेश्वर हा मौजा कळमेश्वर, एस. टी. बस स्टॉप येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत आरोपी नामे कबीर दास ठाकरे, वय २१ वर्ष, रा. जरीपटका भीम चौक, नागपुर जि. नागपूर हा मौजा वाकी दरबार परिसर येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १२ गुन्हे नोंद

दिनांक २६/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, मोहाफुल सडवा, देशी दारू असा एकुण ९७८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे १) सुरेंद्र हरिशंकर तिवारी, वय ३८ वर्ष, रा. मानेगाव कला, ता. रामटेक २) मनराज रामनाथ उईके, वय ३० वर्ष, रा. बोथीया

पालोरा, रामटेक ३) महिला आरोपी ४) केशवराव रंगल वाढीवे, वय ६५ वर्ष, रा. टांगला, ता. रामटेक, जि. नागपुर ५) विशाल दसाराम ईडपाची, वय २७ वर्ष, रा. खुर्सापार, ता. रामटेक, जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०५ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी १) चरणसिंग तारासिंग भोंड, वय ४५ वर्ष, रा. रामठी, ता. नरखेड, जि. नागपुर २) संदिप वासुदेव गाडगे, वय ४० वर्ष, रा. तारा, ता. नरखेड यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी अमोल प्रल्हादराव इंगळे, वय ३८ वर्ष, रा. मसाळा याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड येथे** आरोपी १) धनराज अंबादास जैस्वाल, वय ५८ वर्ष, २) राजेन्द्र रामचंद्र राजगुरू, वय ३८ वर्ष, दोन्ही रा. खैरगाव यांचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल येथे** आरोपी सुखबिर मलकितसिंग बिर, रा. आयुडिपी काटोल, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा येथे महिला** आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड येथे महिला** आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद,

**नमुद कारवाईत एकुण ६३० मिली देशी दारू, ७५ लिटर मोहाफुल दारू, ४० लिटर मोहाफुल रसायन सडवा असा एकुण ९७८०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने